0 4 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ३२ हजारांवर विद्यार्थिनी घेणार पदवी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; उद्या ऑनलाईन दीक्षान्त सोहळा

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त सोहळा शनिवारी (ता. ५) ऑनलाईन होत असून, यंदा ३२ हजार ५२० विद्यार्थिनी पदवी प्रमाणपत्रे स्वीकारणार आहेत. विद्यार्थ्यांच्या तुलनेत हा आकडा अधिक आहे. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत सोहळा होणार आहे.

राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता त्यास सुरुवात होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदक वडरगे (ता. गडहिंग्लज) येथील ऐश्वर्या आकाराम मोरे, तर कुलपती सुवर्णपदक दानोळी (ता. शिरोळ) येथील स्वाती गुंडू पाटील हिला जाहीर झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. शिर्के म्हणाले, 'यंदा ३२ हजार ५२० विद्यार्थिनी, तर २९ हजार ८४० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार आहे. सर्व पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिके पोस्टाद्वारे पाठवली जाणार आहेत. महावितरण स्तरावर होणारा पदवी वितरण कार्यक्रम यंदा होणार नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांचे शुल्क पेमेंट गेटवेद्वारे, तर दीक्षान्त अर्ज फक्त ऑनलाईन स्वरुपात स्वीकारले आहेत. पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ५८ convocation अंतर्गत प्रसिद्ध केली जाणार आहे.'

पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. गजानन पळसे उपस्थित होते.

### यू ट्यूबवर सोहळा

दीक्षान्त सोहळ्यात प्रत्यक्ष कोणतेही पारितोषिक अथवा पदवी प्रदान करण्यात येणार नाही. त्यासंदर्भात स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे निमंत्रितांनीही कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष उपस्थित न राहता विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या यू ट्यूब वाहिनीवरच सकाळी १०.४५ वाजता ऑनलाईन उपस्थित राहून कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

**विद्यापीठाच्या स्थापनेपासून पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण असे :**

| वर्ष | विद्यार्थी | विद्यार्थिनी (कंसात टक्केवारी) |
|---|---|---|
| १९६४ | १०९४ | १९९ (१८.१९%) |
| १९७४ | १००५१ | १६६३ (१६.५५%) |
| १९८४ | १२६२८ | ३२६८ (२५.८८%) |
| १९९४ | २४९३५ | ७८१७ (३१.३५%) |
| २०१८ | ५०४४४ | २६९३८ (५३.४०%) |
| २०२२ | ६२३६० | ३२५२० (५२.१५%) |

**यंदाची पदवी प्रमाणपत्र विद्यार्थी संख्या अशी :**

| शाखा | विद्यार्थिनी | विद्यार्थी |
|---|---|---|
| बी. कॉम. | ७८३३ | ५४०० |
| बी. एस्सी. | ७०३१ | ६८७२ |
| बी. ए. | ४५०२ | ४६१७ |
| एम. एस्सी. | १६७० | ७५१ |
| एम. कॉम. | ११८४ | ७५६ |
| बी. एड. | ६९७ | २०२ |
| एम. ए. | ६६३ | २७७ |

# पदकांवर उमटविली दोघींनी मोहोर

## राष्ट्रपती सुवर्ण पदक मोरेला; कुलपती पदक पाटीलला



ऐश्वर्या मोरे



स्वाती पाटील

कोल्हापूर, ता. ३ : जिद्दीला कष्टाची जोड दिली तर काय होऊ शकते, याची प्रचिती राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती ऐश्वर्या आकाराम मोरे व कुलपती पदक विजेती स्वाती गुंडू पाटील यांनी दिली आहे. दोघीही ग्रामीण भागातील असून, प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

ऐश्वर्या गडहिंग्लज तालुक्यातील वडरगे येथील रहिवासी. तिचे वडील आकाराम मोरे आर्मीत सुभेदार होते. ते कालच (ता. २) निवृत्त झाले. तिचे शालेय शिक्षण गडहिंग्लजमधील विजयमाला दिनकरराव शिंदे हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर तिने कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. आज निवृत्तीनिमित्त तिच्या वडिलांची गावात मिरवणूक होती. त्याच वेळी तिला राष्ट्रपती सुवर्ण पदक जाहीर झाल्याचे कुटुंबीयांना समजल्याने त्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही.

ऐश्वर्या म्हणाली, ''राष्ट्रपती सुवर्ण पदक जाहीर झाल्याचा आनंद मोठा आहे. या यशात माझे आई-वडील व शिक्षकांचा वाटा आहे. प्रशासकीय सेवेत काम करायचे आहे.''

स्वाती मूळची जयसिंगपूर तालुक्यातील दानोळी येथील. तिने राजाराम महाविद्यालयातून पदवी घेतली. सांगलीतील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातून एम.ए. केले. तिचे वडील शेतकरी असून, आई गृहिणी आहे. विशेष म्हणजे लग्नानंतर तिने एम.ए. केले. सासू अंजली, सासरे विजय व पती आदित्य यांनी पाठबळ दिले. एम. ए. परीक्षेत हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळवून ती कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली.

ती म्हणाली, ''मला प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा आहे. संधी मिळाली तर मी शिक्षण क्षेत्रातही काम करेन.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 MAR 2022

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या दीक्षांत समारंभ

## कोल्हापूरच्या ऐश्वर्या मोरेला राष्ट्रपती सुवर्णपदक; स्वाती पाटील कुलपती सुवर्णपदकाची मानकरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ उद्या, शनिवारी सकाळी अकरा वाजता ऑनलाईन स्वरूपात होणार आहे.

सन २०२०-२१ वर्षात क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्र, एनसीसी, एनएसएसमध्ये आदर्श ठरल्याबद्दल विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (रा. वडरगे, ता. गडहिंग्लज) राष्ट्रपती सुवर्णपदकाची, तर एम. ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (रा. दानोळी, ता. शिरोळ) ही कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात ऑनलाईन दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नोलॉजीचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे प्रमुख पाहुणे व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत उपस्थित असणार आहेत. पत्रकार परिषदेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### महाविद्यालयीन स्तरावर पदवी प्रदान समारंभ नाही

महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नसून याच सोहळ्याच्या माध्यमातून स्नातकांना पोस्टाद्वारे प्रमाणपत्रांचे वितरण करणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.



विवेकानंद महाविद्यालयातून बी. एस्सी. पूर्ण केले. वडील सैन्यदलातील सुभेदार (निवृत्त) असून आई सविता गृहिणी आहे. एनएसएस, एनसीसीमध्ये भाग घेतला. कोल्हापूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या स्वच्छता उपक्रमात ७४ रविवारी योगदान दिले आहे. प्रशासकीय अधिकारी व्हायचे आहे.

**- ऐश्वर्या मोरे,**
राष्ट्रपती सुवर्णपदकाच्या मानकरी



राजाराम महाविद्यालयातून बी. ए.ची पदवी घेतली. वडील शेतकरी आणि आई संजीवनी गृहिणी आहेत. पदव्युत्तर शिक्षणानंतर शिक्षण क्षेत्रामध्ये करिअर करणार आहे. कुलपती सुवर्णपदकापर्यंतच्या माझ्या प्रवासात आई-वडील आणि शिक्षकांचे योगदान मोलाचे आहे.

**- स्वाती पाटील,**
कुलपती सुवर्णपदकाच्या मानकरी



### आकडेवारी दृष्टिक्षेपात

विद्याशाखानिहाय पदवीधर
विज्ञान व तंत्रज्ञान : २६८१४
वाणिज्य व व्यवस्थापन : १९७२०
मानव्यविद्या : १४०६४
आंतरविद्याशाखीय : १७६२
पीएच. डी. : १८८
विविध पारितोषिक : २१७
पदवी घेणारे परदेशी विद्यार्थी : १९
पीएच.डी. घेणारे परदेशी विद्यार्थी : २

### पेपरलेस 'दीक्षांत'

यावर्षी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज, शुल्क घेण्याची सर्व प्रक्रिया ऑनलाईन केली असून दीक्षांत समारंभ पेपरलेस झाला आहे. गेल्यावर्षी ९० टक्के पदवी प्रमाणपत्रांचे वितरण दोन महिन्यांत केले होते, असे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

### पदवीधर होण्यात पहिल्यांदाच मुलींची आघाडी

- शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात यंदा पहिल्यांदाच पदवीधर होण्यात मुलींनी आघाडी घेतली आहे,
- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण ३२५२० मुली, तर २९८४० मुले पदवी घेणार आहेत. यावर्षी ६२३६० स्नातकांना पदवी दिली जाणार आहे. त्यात ५२ टक्के मुली आहेत.
- शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात मुलींची संख्या १९९ इतकी होती. पालकांच्या सकारात्मक भूमिकेमुळे वर्षागणिक ती वाढत गेली. उच्च शिक्षणातील मुलींचे वाढत्या प्रमाणाचे हे चांगले चित्र असल्याचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**या वर्षातील पदवीधरांची संख्या**

| अभ्यासक्रम | मुली | मुले |
|---|---|---|
| एम. एस्सी. | १७७० | ७५१ |
| बी. कॉम. | ७८३३ | ५४०० |
| बी. एस्सी. | ७०३१ | ६७७२ |
| एम. कॉम. | ११८४ | ५५६ |
| बी. एड. | ६९७ | २०२ |
| एम. ए. | ६६३ | २७७ |



**वर्ष व वाढलेले मुलींचे प्रमाण**

१९६४ : १९९
१९७४ : १६६३
१९८४ : ३२६८
१९९४ : ७८१७
२०१८ : २६९३८
२०२२ : ३२५२०

### निमंत्रितांनी ऑनलाईन सहभागी व्हावे

दीक्षान्त समारंभात प्रत्यक्ष कोणतेही पारितोषिक, पदवी प्रदान करण्यात येणार नाही. निमंत्रितांनीही 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरच ऑनलाईन उपस्थित राहून कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरु डॉ. शिर्के यांनी केले.

0 4 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या दीक्षान्त समारंभ

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके प्रमुख पाहुणे



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ शनिवारी (दि.५) सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारंभास उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत विशेष अतिथी म्हणून तर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर एम. साळुंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी राष्ट्रपती सुवर्णपदक, कुलपती सुवर्णपदक प्राप्त स्नातकांच्या नावांची घोषणा केली. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र आणि एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (मु.पो. वडरगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (मु.पो. दानोळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक जाहीर झाले.

समारंभात ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येतील. यात विद्यार्थिनींची संख्या ३२ हजार ५२०. (५२.१५ टक्के) आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या १९ असून त्यात दोन पीएच.डी. धारक स्नातकांचा समावेश आहे. पीएच.डी.च्या २२३ तर ११६ पारितोषिके विद्यार्थ्यांना पोस्टाने पाठवली जातील. यावर्षी महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नाही. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या यू ट्यूब वाहिनीवरून थेट प्रसारण केले जाईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे उपस्थित होते.

### प्रमुख पाहुण्यांचा अल्प परिचय...



डॉ. दिनकर साळुंके आंतरराष्ट्रीय ख्यातीचे इम्युनॉलॉजिस्ट व स्ट्रक्चरल बायोलॉजिस्ट आहेत. सध्या इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी, नवी दिल्ली येथे संस्थेचे संचालक आहेत. १९८८ मध्ये डॉ. साळुंके नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्युनोलॉजी, नवी दिल्ली येथे शास्त्रज्ञ म्हणून रूजू झाले. त्यांनी इम्युनॉलॉजीच्या क्षेत्रात मोठे संशोधन केले आहे. त्यांचे १३० शोधनिबंध प्रकाशित आहेत. विविध संसर्गांना शरीर कशाप्रकारे प्रतिकार करते, यावर त्यांचे संशोधनकार्य मूलभूत प्रकाश टाकणारे आहे. डॉ. साळुंके यांना राष्ट्रीय बायोसायन्स पुरस्कार, शांतिस्वरूप भटनागर पारितोषिक, रॅनबॅक्सी संशोधन पुरस्कार, जे.सी. बोस राष्ट्रीय फेलोशीप व जी.एन. रामचंद्रन सुवर्णपदक मिळाले आहे.

### ऐश्वर्या मोरे राष्ट्रपती, स्वाती पाटील कुलपती सुवर्णपदकाची मानकरी



राष्ट्रपती सुवर्णपदक हे प्रामाणिक कष्टाचे फळ आहे. या पुरस्काराने जबाबदारी वाढली आहे. आगामी काळात समाजातील तळागाळातील लोकांची सेवा करायची आहे. यातून विद्यापीठाचा नावलौकिक वाढेल, असा प्रयत्न राहील.

**- ऐश्वर्या मोरे**



कुलपती सुवर्णपदक मिळाल्याचा आनंद आहे. आई-वडील, सासरच्या लोकांनी पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले, यामुळे हे यश मिळाले आहे. कोरोना काळात महाविद्यालयाने शिक्षणात खंड पडू दिला नाही, कायम पाठीशी राहिले.

**- स्वाती पाटील**

0 4 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऐश्वर्या मोरेला राष्ट्रपती तर स्वाती पाटील कुलपती पदक

## शिवाजी विद्यापीठाचा ५८ दीक्षांत सभारंभ उद्या ; ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके प्रमुख पाहुणे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. ५ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला असून, हा सोहळा राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. या सोहळ्याला आभासी पद्धतीने उच्च तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि ज्येष्ठ शास्त्रज्ज्ञ डॉ. दिनकर एम. साळुंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.



**डॉ. दिनकर साळुंके**

या वर्षीच्या सोहळ्यात राष्ट्रपती सुवर्णपदकाच्या मानकरी गडहिंग्लजच्या ऐश्वर्या मोरे, तर कुलपती सुवर्णपदकाच्या मानकरी स्वाती पाटील ठरल्या आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी



प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर, गतवर्षीप्रमाणे यंदा होणारा दीक्षांत समारंभही ऑनलाईन आयोजित केला आहे. सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या समारंभास कुलगुरू, प्र-कुलगुरूंसह वरिष्ठ अधिकारी व सर्व अधिष्ठाता प्रत्यक्ष, तर मान्यवर अतिथी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहणार आहेत. या समारंभात एकूण ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थिनींची संख्या ३२,५२०



**ऐश्वर्या मोरे**



**स्वाती पाटील**

(५२.१५ टक्के) इतकी लक्षणीय आहे. यात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या १९ असून, त्यात दोन पीएच.डी.धारक स्नातकांचाही समावेश आहे. या वर्षी महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नसून, याच मध्यवर्ती दीक्षांत समारंभाच्या माध्यमातून सर्व स्नातकांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रपती सुवर्णपदक आणि कुलपती सुवर्णपदक प्राप्त स्नातकांच्या नावांचीही घोषणा केली. यात विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (वडरगे, ता. गडहिंग्लज) या विद्यार्थिनीस शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. त्याचप्रमाणे एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (दानोळी, ता. शिरोळ) या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले.

### 'शिव-वार्ता'वरून थेट प्रसारण

विद्यापीठाच्या या दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष कोणतेही पारितोषिक अथवा पदवी प्रदान करण्यात येणार नाही. त्यासंदर्भात स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे निमंत्रितांनीही कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष उपस्थित न राहता विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरच सकाळी १०.४५ वा. ऑनलाईन उपस्थित राहून कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू शिर्के यांनी केले.

0 4 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऐश्वर्याला राष्ट्रपती, स्वातीला कुलपती सुवर्णपदक

## दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे जीवशास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती



डॉ. दिनकर साळुंके



ऐश्वर्या मोरे



स्वाती पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत सोहळा उद्या शनिवार (दि. ५) रोजी सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे भारतातील नामवंत जीवशास्त्रज्ञ दिनकर साळुंके (मूळ गाव बेळगाव) उपस्थित आहेत. अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंग कोश्यारी तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती आहे. यंदा राष्ट्रपती सुवर्णपदक ऐश्वर्या मोरे तर कुलपती सुवर्णपदक स्वाती पाटील यांना जाहीर झाले आहे. अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

- उद्या ऑनलाईन दीक्षांत समारंभ
- ६२३६० विद्यार्थ्यांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून दीक्षांत सोहळा ऑनलाईन पद्धतीने साजरा केला जातो. यंदाच्या दीक्षांत समारंभात पदवी ६२ हजार ३६० विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. प्रमुख पाहुणे, राज्यपाल व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ऑनलाईन मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पदवीदान समारंभ पेपरलेस केला आहे.

### प्रमुख पाहुण्यांची ओळख

डॉ. दिनकर साळुंके आंतरराष्ट्रीय ख्यातीचे इम्युनॉलॉजिस्ट आणि स्ट्रक्चरल बायोलॉजिस्ट आहेत. नवी दिल्लीतील इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक आहेत. त्यांचा जन्म १ जुलै १९५५ रोजी बेळगाव येथे झाला असून, भौतिकशास्त्र, गणित, सांख्यिकी विषयांत बी.एस्सी. व एम. एस्सी. धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठ पूर्ण केली. बेंगलोरमधून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मॉलेक्युलर बायोफिजिक्समध्ये पीएच. डी., अमेरिकेतील वॉल्थम, मॅसॅच्युसेट्समध्ये ब्रँडाईस विद्यापीठात पोस्टडॉक्टर संशोधन, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्युनोलॉजी, शास्त्रज्ञ, स्ट्रक्चरल बायोलॉजी समूहाची स्थापना, ट्रान्सलेशनल हेल्थ सायन्स अँड टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट कार्यकारी संचालक, इम्युन रिकशिन, मॉलेक्युलर मिमिक्री आणि ॲलर्जीचे संरचनात्मक जीवशास्त्रात इम्युनॉलॉजीच्या क्षेत्रात संशोधन, राष्ट्रीय बायोसायन्स पुरस्कार, शांतिस्वरुप भटनागर पारितोषिक, जे. सी. बोस राष्ट्रीय फेलोशीप, जी. एन. रामचंद्रन सुवर्णपदकाने त्यांचा गौरव केला आहे.



### पीएच. डी. पदवी पारितोषिके

| विद्यार्थी | पारितोषिक |
|---|---|
| १८८ | २९ |

### माझी जबाबदारी वाढली

वडरगे (ता. गडहिंग्लज) माझे गाव. कोल्हापूर विवेकानंद कॉलेज येथे रसायनशास्त्रातून बीएस्सी केली. तर विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागात एमएस्सी द्वितीय वर्षाला आहे. एनसीसी, एएसएस राष्ट्रीय कँप केले. महापालिकेची स्वच्छता मोहिम ७४, स्वच्छतेचे काम, प्रधानमंत्री जनधन योजना, जीवन विमा योजना, उज्ज्वला योजनांचा प्रचार केला आहे. दहा मुलांना शिक्षणासाठी दत्तक घेतले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा यंदाचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. माझे वडील अकाराम पाटील भारतीय लष्करात आहेत. मला विद्यापीठाचा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने माझी जबाबदारी वाढली.

**ऐश्वर्या मोरे (विद्यार्थीनी)**

### मला प्राध्यापक व्हायचे आहे

कुलपती सुवर्णपदक मिळाल्याने मला खूप आनंद होत आहे. माझ्या यशात वडील गुंडू पाटील, आई अंजली पाटील यांचे मोठे योगदान आहे. कोल्हापुरातील राजाराम कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे तर सांगलीतील कस्तूरबाई वालचंद कॉलेजमध्ये एम. ए. हिंदीमधून शिक्षण घेत आहे. मी आंतरराष्ट्रीय कराटे, राष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू आहे. मला प्राध्यापक किंवा सरकारी नोकरी करायची आहे.

**- स्वाती पाटील**

जनसंपर्क कक्ष
0 4 MAR 2022 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यपाल, उच्च शिक्षण मंत्री यांच्या उपस्थितीत उद्या शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५८वा दीक्षान्त समारंभ ५ मार्च रोजी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत विशेष अतिथी म्हणून, तर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर एम. साळुंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे उपस्थित होते.

या समारंभात एकूण ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येतील. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या १९ असून त्यात दोन पीएच.डी. धारक स्नातकांचाही समावेश आहे. या वर्षी महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नसून याच मध्यवर्ती दीक्षान्त समारंभाच्या माध्यमातून सर्व स्नातकांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या श्रीमती ऐश्वर्या आकाराम मोरे (कोल्हापूर) या विद्यार्थिनीस विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक तर सांगली येथील स्वाती गुंडू पाटील या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले.

पुढारी

# पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण वाढले

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांन्त समारंभ शनिवारी होत आहे. यंदा राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदकावर मुलींनीच मोहोर उमटवली आहे. ३२ हजार ५२० विद्यार्थिनी तर २९ हजार ८४० विद्यार्थी पदवी घेणार आहेत. यावर्षी पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण सर्वाधिक आहे.

दीक्षान्त समारंभात यावर्षी विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा (२६,८१४), वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखा (१९,७२०), मानवविद्या शाखा (१४,०६४), आंतरविद्याशाखा (१७२) पदव्यांचे वितरण केले जाणार आहे. यंदा पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींची टक्केवारी ५२.१५ टक्के आहे. यावर्षी एम.ए. (मुली-६६३, मुले- २७७), एम.कॉम. (मुली-११८४, मुले-५५०), एम.एस्सी. (मुली-१६७०, मुले- ७५१), बी.ए. (मुली-४५०२, मुले- ४६१७), बी.कॉम. (मुली-७८३३, मुले- ५४००), बी.एस्सी. (मुली-७०३१, मुले- ६७२), बी.एड. (मुली-६९७, मुले- २०२), एमसीए (मुली-११२, मुले- ४२), पीएच.डी. (मुली-४६, मुले- ६९), बी.फार्मसी (मुली-६०१, मुले-४८५) पदव्या मिळवल्या आहेत.

सकाळ

# विद्यापीठात विज्ञान सप्ताह साजरा

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे 'स्तुती' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्रातर्फे आयोजित 'विज्ञान जागृती सप्ताह' यशस्वी झाला. उपक्रमाचा लाभ दोन महाविद्यालये व १४ शाळांतील ७०० विद्यार्थ्यांनी घेतला. प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. विद्यार्थ्यांच्या प्रवासासह जेवणाची सोय डीएसटी केंद्राद्वारे केली होती. विद्यार्थ्यांना शब्दकोश, कंपास, वही व पेन या शालोपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या. तसेच कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व प्रा. डॉ. सोनकवडे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देण्यात आले.